


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ३५४ वा मंगळवार दि २८ एप्रिल २०२६ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# आता मराठी बोलावीच लागणार! महायुतीचे तीनही पक्ष ठाम, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनही भूमिका स्पष्ट....

**वृत्तसंस्था/मुंबई**

गेल्या काही दिवसांपासून मराठी भाषेच्या मुद्द्यावरुन वातावरण तापलं आहे. महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी राज्यातील सर्व टॅक्सी आणि रिक्षा चालकांसाठी मराठी भाषा सक्तीची केली आहे. तसेच मराठी बोलता आली नाही तर थेट परवाना रद्द केला जाईल, असा कडक नियम लागू करण्यात येणार आहे. येत्या १ मे महाराष्ट्र दिनापासून या नियमांचे कडकपणे अंमलबजावणी केली जाणार आहे. पण राज्य सरकारच्या या निर्णयाला मुंबईतील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालक नाराज आहेत. अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांनी सरकारला थेट संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. यामुळे मराठीसक्तीच्या मुद्द्यावरुन मुंबईत राजकारणदेखील तापताना दिसत आहे. याच प्रकरणात आज महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेत. विशेष म्हणजे या मुद्द्यावर आता महायुतीच्या पक्षांचे एकमत होताना दिसत आहे. रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी सक्तीच्या निर्णयाला शिवसेनेचे नेते संजय निरुपम यांनी आक्षेप घेतला आहे. त्यांनी कुणाला कुठल्याही भाषेची सक्ती करणं योग्य नसल्याचं म्हटलं आहे. असं असलं तरी शिवसेनेचे नेते तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक हे मराठी सक्तीसाठी आग्रही आहेत. मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. त्यामुळे मुंबई आणि महाराष्ट्रात व्यवसाय करायचा असेल तर मराठी भाषा बोलता येणं अनिवार्य असल्याचं प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे. मराठी सक्तीच्या निर्णयावरुन प्रताप सरनाईक यांची आज मुंबईत रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या संघटनांसोबत चर्चा झाली. या चर्चेत मराठी शिकवण्यासाठी काय-काय उपाययोजना केल्या जातील. तसेच रिक्षा आणि टॅक्सी चालकांना वेळ हवा असल्यास तो देण्याबाबतही या बैठकीत चर्चा झाल्याची माहिती आहे. या बैठकीनंतर प्रताप सरनाईक यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी मराठी भाषेच्या सक्तीच्या निर्णायवर आपण ठाम असल्याचं स्पष्ट केलं. तसेच मराठी शिकण्यासाठी अमराठी चालकांना वेळ वाढवून द्यायचा का? याबाबत लवकरच भूमिका स्पष्ट करणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी सक्तीच्या या निर्णयाचं महायुतीमधील इतर घटकपक्षांकडून स्वागत केलं जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. प्रताप सरनाईक यांच्या निर्णयाला त्यांनी पाठिंबा दिला आहे. तसेच महायुतीचा दुसरा घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडूनही आता अधिकृत प्रतिक्रिया समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुनील तटकरे यांनी याबाबत भूमिका मांडली आहे. त्यांना या निर्णयाचं स्वागत केलं आहे. देशातील कोणत्याही प्रदेशात आपण गेल्यानंतर त्या प्रदेशाची



संस्कृती आणि भाषा आपण आपलीशी करून घ्यायला हवी, विविधतेत एकता हे एक आपल्या देशाचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. स्थानिक भाषा आणि संस्कृती आत्मसात केल्याशिवाय हे वैशिष्ट्य टिकून राहणार नाही, अशी भूमिका सुनील तटकरे यांनी मांडली आहे. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. इथे येणाऱ्या प्रत्येकाने इथल्या संस्कृतीचा आणि भाषेचा आदर केलाच पाहिजे. रिक्षा-टॅक्सीचालक हा प्रवाशांशी थेट जोडलेला असतो, त्यामुळे त्याला मराठी येणे हे प्रवाशांच्या सोयीचेही आहे. यासंदर्भात टप्प्याटप्प्याने मराठीच्या सक्तीची अंमलबजावणी करायला हरकत नाही. दुसऱ्या बाजूला मराठी प्रवाशांनीही प्रवास करताना जाणीवपूर्वक मराठी भाषेचा वापर करावा, असं आवाहन सुनील तटकरे यांनी केलं आहे

# नितेश राणे यांना कोर्टाकडून 1 महिने कारावासाची शिक्षा...

**वृत्तसंस्था/ सिंधुदुर्ग**

भाजप नेते तथा राज्याचे मत्सव्यवसाय आणि बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांना धक्का देणारी मोठी बातमी समोर आली आहे. नितेश राणे यांना कणकवली न्यायालयाने १ महिन्यांचा कारावासाची शिक्षा सुनावली आहे. यासोबतच १ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. कणकवली न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या विरोधात मंत्री नितेश राणे हे मुंबई उच्च न्यायालयात धाव घेण्याची शक्यता आहे. या निर्णयाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं जाणार आहे. पण कणकवली न्यायालयाचा निकाल समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आलं आहे. या प्रकरणावर आता नितेश राणे काय भूमिका मांडतात? ते पाहणं महत्त्वाचं आहे. दरम्यान, नितेश राणे यांना नेमकं कोणत्या प्रकरणात न्यायालयाने दोषी ठरवत एक महिना कारावासाची शिक्षा सुनावली आहे? त्याबाबत सविस्तर जाणून घेऊयात. नितेश राणे यांनी मुंबई-गोवा महामार्गाचे अभियंता प्रकाश शेडेकर यांच्यावर चिखलफेक केली होती. संबंधित घटना ही ४ एप्रिल २०१९ रोजी घडली होती. याच प्रकरणी नितेश राणे यांना कणकवली न्यायालयाने दोषी ठरवलं आहे. नितेश राणे यांच्यावर सरकारी कामात अडथळा आणल्याचा आणि सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी शिक्षा सुनावली आहे. कलम ५०४ अंतर्गत त्यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. या प्रकरणात २९ संशियतांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. पण नितेश राणे यांना न्यायालयाने दोषी ठरवलं आहे. नितेश राणे हे त्यावेळी कणवली विधानसभा मतदारसंघाचे आमदार होते. त्यांनी मुंबई-गोवा महामार्गाच्या कामांची पाहणी केली होती. त्यावेळी कणवली शहरातील रस्त्यांची अवस्था चिखलमय झाली होती. नितेश राणे यांनी अभियंता प्रकाश शेडेकर यांना बोलावलं होतं. त्यांनी सरकारी अभियंते प्रकाश शेडेकर यांच्यासोबत रस्त्यांची पाहणी केली होती. याचवेळी नितेश राणे यांच्या कार्यकर्त्यांनी प्रकाश शेडेकर यांच्यावर चिखलफेक केली होती. या घटनेचा व्हिडीओदेखील व्हायरल झाला होता. नितेश राणे यांच्या वकिलांकडून न्यायालयाच्या निकालावर प्रतिक्रिया देण्यात आली आहे. ‍‍आम्ही जो अर्ज दिलेला होता त्या अर्जानुसार कोर्टाने त्या निकालाला स्थगिती दिलेली आहे. म्हणजेच कलम ५०४ अंतर्गत जी शिक्षा देण्यात



आली आहे त्याला स्थगिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे आजच्या घडीला त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेला स्थगिती देण्यात आली आहे. आम्ही या प्रकरणी उच्च न्यायालयात रिव्हीजन दाखल करु आणि योग्य ती कायदेशीर कारवाई करु‍‍, अशी प्रतिक्रिया मंत्री नितेश राणे यांच्या वकिलांनी दिली

# सगुण-निर्गुण: शब्दगुरु



नेणीवेचा बर्फ वितळतो. मग शब्द प्रवाही होतात. आठव्या प्रहरात अंधारात मंत्र ऐकू येतो. वर्षानुवर्ष. सत नाम वाहे गुरु. नांदेड. नंदीतट. नंदिग्राम. सचखंड. गोदाकाठ. संतश्रेष्ठ दासगणु महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली आमची वास्तू. वाड्यामागे दोनशे पावलांवर बंदाघाट. चारशे पावलांवर नगीना घाट. हजार पावलांवर पवित्र गुरुद्वारा. गुरु गोविंद सिंह महाराजांचे समाधीस्थळ. प्रेमळ, श्रद्धाळू पंजाबी भक्तांच्या अलोट गर्दीने वेढलेलं. सतत मंत्र. सत नाम वाहेगुरू. ईश्वर सत्य आहे. शाश्वत आहे. सचखंड म्हणजे सत्याची भूमी. माधो दास हे वैरागी पुरुष. गुरुगोविंद सिंह यांचे शिष्य बनले. नामकरण केलं बंदा सिंह बहादुर. म्हणून बंदाघाट. एका व्यापाऱ्याने दिलेलं रत्न गुरुगोविंद सिंग महाराजांनी नदीत फेकून दिलं. व्यापारी नाराज झाल्यावर त्याला तो नगीना नदीत शोधायला सांगितला. तिथे त्याला अनेक रत्नं दिसली. अहंकार दूर करणारा नगीना म्हणून नगीना घाट. काय योगायोग. नामदेव महाराज तिकडे नदीत परीस फेकतात. लोककथा मूल्यांची रुजवण करतात म्हणून त्या जगभर मोलाच्या मानल्या जातात. प्रतिकात्मक अर्थात जीवन रहस्यांचा शोध घेता येतो. ते पंजाबमध्ये वीस वर्षं राहतात. भगत नामदेव बाबा होतात. त्यांचे एकसष्ट शब्द (पदं ) गुरु ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट केले जातात. गुरु गोविंद सिंह गोदेगाठी येतात. इथेच देह ठेवतात. इथेच सांगतात, आता मानवी गुरू असणार नाही. नाम जप करा. कष्टाने अर्थार्जन करा. आपल्या कमाईतला काही अंश गरजूंना द्या. समता आणि बंधुभाव, स्त्री पुरुष समानता शिकवणारा आणि विकारांवर नियंत्रण करायला लावणारा हा ग्रंथ. सर्व समावेशकता अशी की शीख गुरूंसोबत कबीर, नामदेव, फरीद आणि रविदास महाराजांची पदं यात आहेत. एकतीस रागांमध्ये संगीतबद्ध असलेला हा ग्रंथ. सतत सबद कीर्तनातून यातील संदेश मनावर गारूड करतो. ङ्गआसा दी वारफ म्हणजे आशेचं गीत. आशेचं गीत मनात प्रज्वलित करणारा हा ग्रंथ. या ग्रंथासमोर माथा टेकवता येतो ही केवढी भाग्याची गोष्ट.






*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



### 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शुभारंभ

# नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्य दुष्काळमुक्त करणार : मुख्यमंत्री फडणवीस

■ नाशिक/वृत्तसंस्था

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवाचे औचित्य साधून महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत आयोजित करण्यात आलेल्या 'गोदा ते नर्मदा' जलयात्रेचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे झाला. नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून राज्याला दुष्काळमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने निर्मळ आणि अविरल गोदावरीसाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

अहिल्यादेवींचे विचार, वारसा आणि विकास हा त्रिसूत्री मंत्र घेऊन ही यात्रा सुरू झाली आहे. कार्यक्रमाला अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, इंदूर संस्थानचे श्रीमंत युवराज महाराज यशवंतराव होळकर, अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे पीठाधीश गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे, नाशिकच्या महापौर हिमगौरी आडके, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वेदात नदीचे महात्म्य वर्णन केले असून नदीला आई मानले आहे. नदी स्तुतीसुक्तात ऋषीमुनींनी नदीच्या उपयुक्ततेचे वर्णन केले आहे. वारशाचे संवर्धन आणि विकास याचा समन्वय देशाच्या उज्वल भवितव्यासाठी आवश्यक आहे. म्हणूनच अहिल्यादेवींच्या विचारांच्या आधारे भविष्यातील विकासाची दिशा दाखविण्यासाठी या यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. गोदावरी नदी महाराष्ट्रासह आंध्रप्रदेशासाठी महत्वाची असल्याने ती बारमाही प्रवाहित राहावी यासाठीदेखील प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले..

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या जलव्यवस्थापनातील योगदानाचे स्मरण केले. ते म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी घाट, बारव यांची निर्मिती करताना अध्यात्मिकता आणि उपयुक्तता याचा समन्वय साधला. पाण्याचे महत्व लक्षात घेऊन जलव्यवस्थापनावर भर दिला. त्यांनी निर्माण केलेले बारव आजही सुस्थितीत असून त्याचे संवर्धन राज्य शासन करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

अहिल्यादेवी होळकर यांनी नद्यांचे महत्व जाणले आणि नदी प्रदूषण रोखण्याचे प्रयत्न केले. महिला, गरीब आदिवासींना समाजाच्या मुख्य धारेत आणण्याचे कार्य त्यांनी केले. त्यांचे विचार आजही महत्वाचे आणि मार्गदर्शक असून छत्रपती शिवाजी महाराज आणि अहिल्यादेवी यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या विचारांच्या आधारेच शाश्वत विकास साधता येईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

मंत्री विखे-पाटील म्हणाले, त्र्यंबकेश्वर आणि चोंडी येथून दोन यात्रा सुरू होत असून मध्य प्रदेशातील महेश्वर येथे नर्मदातीरी समारोप होणार आहे. राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून नर्मदेला अर्पण करण्यात येईल. गोदावरी आणि नर्मदेचे महात्म्य



लक्षात घेऊन आणि विचार, वारसा आणि विकास ही त्रिसूत्री घेऊन यात्रेच्या माध्यमातून जलसंवर्धनाचा संदेश देण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी केलेले जलसंवर्धनाचे कार्य जनतेत रुजविण्याचा प्रयत्न या यात्रेद्वारे करण्यात येणार आहे, असे त्यांनी सांगितले. नागरिकांनी या यात्रेत सहकार्य करावे, असे आवाहनही मंत्री विखे-पाटील यांनी केले.

आण्णासाहेब मोरे म्हणाले, जलसाक्षरतेचे विचार सेवेकऱ्यांमार्फत पोहोचविण्यात येत आहेत. गुरुपीठाच्या माध्यमातून नदी स्वच्छता उपक्रम राबविण्यात येत आहेत. देशाच्या विकासासाठी थोरामोठ्यांचे विचार भारतभर पोहोचविण्याचे काम करावे लागतील. संस्कृती, संस्कार केले तर देश बलशाली आणि विकसित होईल. नवीन पिढीने निर्व्यसनी राहून देशाचे संस्कारदूत बनावे, असे आवाहन त्यांनी केले. मुख्यमंत्र्यांच्या आगमनाने कुंभमेळ्याच्या कामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त करून कुंभमेळ्यात गर्दीच्या नियोजनाबाबत त्यांनी सूचना केल्या.

युवराज होळकर म्हणाले, अहिल्यादेवी होळकर यांनी जलव्यवस्थापनाची सुरुवात नर्मदा येथे केली. जलसाक्षरता आणि जलव्यवस्थापन ही काळाची गरज आहे. गोदावरी आणि नर्मदेला जोडून 'एक भारत श्रेष्ठ भारत'चा संदेश दिला जाणार आहे. गोदावरी महाराष्ट्राची तर नर्मदा मध्यप्रदेशची जीवनधारा आहे. जन्मभूमी ते कर्मभूमी जलयात्रेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले. अहिल्यादेवींनी सुरू केलेली फड पद्धती उपयुक्त असून ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या हस्ते कुशावर्तातील जलकलश मुख्यमंत्री फडणवीस यांना सुपूर्द करण्यात आला आणि राज्यातील ३० नदीखोऱ्यांतील पाणी कलशांच्या माध्यमातून आणून त्याचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. केदार कंठशिखर वयाच्या सहाव्या वर्षी सर करणाऱ्या चिमुकल्या मनकर्णिका देशपांडे हिचा सत्कार मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. 'गोदा ते नर्मदा जलयात्रा २०२६' या गीताचे विमोचन आणि उन्नत नाशिक अभियानाच्या बोधचिन्हाचे अनावरण मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमापूर्वी श्री. विखे पाटील यांनी सपत्नीक १०८ कन्यकांचे पूजन केले.

कार्यक्रमाला माजी मंत्री रवींद्र चव्हाण, सदाभाऊ खोत, आमदार गोपीचंद पडळकर, राहुल आहेर, सीमा हिरे, देवयानी फरांदे, हिरामण खोसकर, दिलीप बनकर, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, मंत्री विखे पाटील यांच्या पत्नी शालिनीताई विखे पाटील, नगराध्यक्षा त्रिवेणी तुंगार, ह.भ.प.संजय नाना धोंगडे, महंत उद्धव महाराज मंडलिक, मंदाकिनी मोरे, महामंडलेश्वर रामचंद्रदास मोरे, उपमहापौर विलास शिंदे आदी उपस्थित होते.

'जल व्यवस्थापन कृती पंधरवड्या'अंतर्गत आयोजित या जलयात्रेचा मुख्य उद्देश राज्यातील जलस्त्रोतांबाबत जनजागृती करणे, लोकसहभाग वाढवणे आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाची संकल्पना अधिक बळकट करणे हा आहे. ही जलयात्रा २५ एप्रिल ते २९ एप्रिल या कालावधीत महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशातील विविध जिल्ह्यांतून प्रवास करणार आहे. यात्रेत सुमारे ५०० जलयात्री, वारकरी आणि तरुण सहभागी झाले आहेत.

## मानस प्रकल्पातून बालकांच्या मानसिक आरोग्यास बळकटी : डॉ.संजय पुराणिक

■ मुंबई, वृत्तसंस्था :

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व मनमुक्त फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'मानस प्रकल्प-सुरक्षित बालपण, समृद्ध महाराष्ट्र' अंतर्गत बालकांच्या मानसिक आरोग्यासाठी विशेष अभियान राबविण्यात येणार असून, याची सुरुवात प्रायोगिक तत्वावर राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये करण्यात येणार असल्याची माहिती राज्य हक्क बाल संरक्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ. संजय पुराणिक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली.

सद्यस्थितीत विद्यार्थ्यांमध्ये वाढता तणाव, नैराश्य आणि स्पर्धात्मक वातावरणामुळे निर्माण होणाऱ्या मानसिक आव्हानांच्या पार्श्वभूमीवर हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याच्या जतनासाठी समग्र दृष्टिकोन अवलंबण्यात येणार असून, त्यात पालक व शिक्षकांचाही सक्रिय सहभाग राहणार आहे. या विषेश अभियानासाठी लवकरच जिल्ह्यांची निश्चिती करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये स्व-जाणीव, भावनिक बुद्धिमत्ता, तणाव व्यवस्थापन, निर्णयक्षमता व नेतृत्वगुण विकसित करण्यावर या प्रकल्पाचा भर असेल. इयत्ता पहिली ते १२ वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी वयोगटानुसार अभ्यासक्रम तयार करण्यात येणार असून, तो मानसशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ व समुपदेशक यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित केला जाणार आहे. यामध्ये ॲक्टिव्हिटी वर आधारित आणि शिकण्यातून प्रयोगशील अनुभव घेण्याच्या पद्धतीचा वापर केला जाईल.

पालकांसाठी 'कॉन्शियस पॅरेन्टिंग' व संवाद कौशल्य प्रशिक्षण, तर शिक्षकांसाठी भावनिक सहाय्य व वर्ग व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. वर्षभर चालणाऱ्या या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सकारात्मकता व भावनिक स्थैर्य वाढण्यास मदत होईल, तसेच शाळांमध्ये तणावमुक्त व सहकार्यशील वातावरण निर्माण होईल. पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये टप्प्याटप्प्याने विस्तारण्याचा मानस असून, शालेय शिक्षण व्यवस्थेत मानसिक आरोग्याचा समावेश करण्यासाठीही प्रयत्न करण्यात येणार असल्याचे डॉ. पुराणिक यांनी सांगितले. या उपक्रमात सर्व शाळा, पालक व शिक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही आयोगामार्फत करण्यात आले आहे.

## पाकिस्तानात अमेरिका-इराण थेट चर्चेत पेच!

### ट्रम्प यांचे दूत अन् इराणचे मंत्री आमनेसामने..

■ तेहरान/वॉशिंग्टन/वृत्तसंस्था

अमेरिका आणि इराणमधील तणाव निवळण्यासाठी आता पाकिस्तानची राजधानी इस्लामाबादमध्ये खलबतं सुरू झाली आहेत. अमेरिकेचे विशेष दूत स्टीव विटकॉफ आणि जेरेड कुशनर इराणच्या प्रतिनिधींची बाजू ऐकण्यासाठी पाकिस्तानात पोहोचत आहेत. मात्र, चर्चेची टेबलं तयार असली तरी इराणने अमेरिकेशी थेट संवाद साधण्यास नकार दिल्याने पाकिस्तानात अमेरिका-इराण थेट चर्चेत पेच निर्माण झाला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्धविराम वाढवण्याचे संकेत दिले असले तरी, होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी हटवण्यास नकार दिला आहे. यावरून इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची संतापले आहेत. होर्मुझची नाकेबंदी हा युद्धविरामाचाच भंग आहे. जोपर्यंत ही नाकेबंदी हटवली जात नाही, तोपर्यंत अमेरिकेशी कोणतीही थेट चर्चा होणार नाही, अशी भूमिका अराघची यांनी इस्लामाबादमध्ये पोहोचताच मांडली. व्हाईट हाऊसच्या प्रेस सचिव कॅरोलिन लीविट यांनी सांगितले की, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प कूटनीतीला एक संधी देऊ इच्छितात. जर चर्चेत सकारात्मक प्रगती झाली, तर अमेरिकेच्या उपराष्ट्राध्यक्षांनाही पाकिस्तानात पाठवण्याची तयारी ट्रम्प यांनी दर्शवली आहे. अमेरिकेचे प्रतिनिधी रविवार, २६ एप्रिल रोजी इराणच्या अटी आणि मागण्यांवर चर्चा करण्याची शक्यता आहे.



**पाकिस्तान मार्फत होणार मेसेज पास?**

इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माइल बगाई यांनी स्पष्ट केले की, इस्लामाबादमध्ये अमेरिका आणि इराणच्या अधिकाऱ्यांमध्ये समोरासमोर कोणतीही बैठक ठरलेली नाही. इराणचे म्हणणे पाकिस्तानमार्फत अमेरिकेपर्यंत पोहोचवले जाईल. म्हणजेच, पाकिस्तान या दोन कट्टर शत्रूंमध्ये मध्यस्थ म्हणून महत्त्वाची भूमिका बजावत आहे. अराघची हे पाकिस्तानचे पंतप्रधान शहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसीम मुनीर यांचीही भेट घेणार आहेत.

# रियाझ काझीविरोधातील आरोप महिला कर्मचाऱ्याने फेटाळले; प्रकरणाला नवे वळण

■ नागपूर, वृत्तसंस्था :

उत्तर-पश्चिम नागपूरमधील वादग्रस्त स्वयंसेवी संस्थेच्या प्रकरणात महत्त्वाचे नवे वळण समोर आले आहे. संस्थेच्या अध्यक्षांविरोधातील लैंगिक छळ, धर्मांतरणासाठी दबाव आणि गैरवर्तनाचे गंभीर आरोप संस्थेतीलच एका महिला कर्मचाऱ्याने फेटाळून लावत प्रकरणाच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

संस्थेत पर्यवेक्षक म्हणून कार्यरत गुंजन पासवान यांनी अध्यक्षांविरोधातील सर्व आरोप स्पष्टपणे नाकारले आहेत. त्या जुलै २०२४ पासून संस्थेशी संलग्न असून कार्यालयीन कामकाज, फील्ड व्हिजिट तसेच बाहेरगावी दौऱ्यांदरम्यान अध्यक्षांसोबत त्यांनी जवळून काम केल्याचा अनुभव सांगितला. "माझ्या कामाच्या काळात कधीही असुरक्षितता, अनुचित स्पर्श किंवा



आक्षेपार्ह वर्तनाचा अनुभव आलेला नाही," असे त्यांनी सांगितले. अध्यक्षांकडून व्यावसायिक मर्यादा कायम राखल्या जात असल्याचा दावा त्यांनी केला.

धर्मांतरणासाठी दबाव टाकल्याच्या आरोपांवरही पासवान यांनी स्पष्टीकरण दिले. संस्थेत विविध धर्मीय कर्मचारी कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद करत, "अध्यक्ष स्वतःच्या श्रद्धेनुसार वागत असले तरी त्यांनी कधीही इतरांवर धार्मिक आचरण लादण्याचा प्रयत्न केलेला नाही," असे त्या म्हणाल्या. संस्थेच्या कामकाजात कोणत्याही प्रकारचा धार्मिक दबाव नसल्याचा दावा त्यांनी केला. तक्रारदार महिलेविरोधात पूर्वीपासून शिस्तभंगाची कारवाई सुरू असल्याचा आरोप पासवान यांनी केला. वारंवार अनुपस्थिती, अनियमित उपस्थिती आणि कामातील दुर्लक्ष यामुळे २ एप्रिल रोजी तिला इशारा देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. "पुढील कारवाई टाळण्यासाठीच हे प्रकरण उभे करण्यात आले असावे," असा आरोप त्यांनी केला. तसेच, काही बाह्य संघटनांच्या हस्तक्षेपामुळे या प्रकरणाला वेगळी दिशा मिळाल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या अध्यक्षांचे महिला कर्मचाऱ्यांप्रती वर्तन मर्यादित आणि सभ्य असल्याचे सांगत पासवान यांनी "अगदी हस्तांदोलन टाळण्याइतकेही त्यांनी अंतर राखले," असे नमूद केले. आर्थिक अडचणीत कर्मचाऱ्यांना मदत करण्याची त्यांची तयारी असायची, असेही त्यांनी सांगितले. कामातील त्रुटींमुळे काही वेळा कठोर शब्दांचा वापर झाला असण्याची शक्यता त्यांनी मान्य केली, मात्र त्याला लैंगिक छळाचे स्वरूप देणे योग्य नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, संस्थेतील इतर काही कर्मचारीही अध्यक्षांच्या समर्थनात असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, माध्यमांसमोर आल्यास अनावश्यक वाद निर्माण होईल या भीतीमुळे ते पुढे येण्यास टाळाटाळ करत असल्याचे सांगितले जाते. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी झाल्यास सत्य समोर येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

## भररस्त्यात तरुणाची चाकूने भोसकून हत्या

■ नांदेड, वृत्तसंस्था :

नांदेड शहरात गुन्हेगारीने पुन्हा एकदा डोके वर काढले असून, कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एप्रिलच्या सुरुवातीला ४८ तासांत झालेल्या पाच खुनांच्या सत्रातून शहर सावरत असतानाच, शुक्रवारी रात्री पावडेवाडी परिसरात एका तरुणाची चाकूने भोसकून निर्घृण हत्या करण्यात आली. विशेष म्हणजे स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) प्रमुखपदी पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी पदभार स्वीकारताच ही घटना घडल्याने गुन्हेगारांनी एकप्रकारे पोलिसांनाच 'सलामी' दिल्याची चर्चा शहरात रंगली आहे.

शहरातील पावडेवाडी भागातील नवीवाडी येथील रहिवासी प्रताप दत्ता गायकवाड (वय ३०) याचा जुन्या वादातून सोनू ऊर्फ अनिकेत सदाशिव बुक्तरे (वय २८) याने आपल्या साथीदारांसह पाठलाग केला. सम्राट वाईन मार्टसमोर गाठून आरोपींनी प्रतापवर चाकूने सपासप वार केले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या प्रतापचा जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रचंड खळबळ उडाली. खूनाच्या घटनेनंतर अप्पर पोलीस अधीक्षक सूरज गुरव यांनी तातडीने घटनास्थळी भेट देत तपासचक्र फिरवले. भाग्यनगर पोलिसांनी मुख्य आरोपी सोनू बुक्तरे आणि त्याचा साथीदार विजय वायवळ याला रात्रीतूनच ताब्यात घेतले आहे. वाढत्या गुन्हेगारीमुळे एलसीबीचे तत्कालीन प्रमुख उदय खंडेराय यांची बदली करून बिलोलीचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्याकडे सूत्रे सोपवण्यात आली; पण पहिल्याच दिवशी खुनाची घटना घडल्याने गुन्हेगारांचे मनोबल वाढल्याचे चित्र आहे. या घटनेनंतर आता भाग्यनगर पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकाऱ्यांवरही बदलीची टांगती तलवार असल्याचे समजते. नांदेड 'क्राईम कॅपिटल' बनत चालल्याने सामान्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. कोम्बिंग ऑपरेशन राबवूनही गुन्हेगार मोकाट आहेत. आता एलसीबीचे नवे प्रमुख अतुल भोसले हे 'गँग आणि अशा अट्टल गुन्हेगारांच्या मुसक्या कशा आवळतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सिमेंटच्या गोण्याआड विदेशी मद्याची वाहतूक, ठाणे उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई

■ ठाणे/वृत्तसंस्था

सिमेंट गोण्यांच्या आड लपवून परराज्यातील विदेशी मद्याची बेकायदेशीर वाहतूक होत असल्याची बाब ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईतून उघडकिस आली आहे. या कारवाईत ट्रक, मद्य साठा असा एकूण सुमारे १.४५ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

वाहनचालक दिनेश कैलास नाथ आणि अनिल कुमार श्यामलाल नायक यांना अटक करण्यात आली आहे. २४ एप्रिल रोजी ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथक क्रमांक १ यांना मद्य वाहतुकी बाबत माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पथकाने बेलापूर-ठाणे रोडवरील डी. वाय. पाटील स्टेडियमजवळील परिसरात सापळा रचला होता. सायंकाळी सुमारे ५.१५ वाजता पथकाने एक दहाचाकी ट्रक ट्रक थांबवून त्याची तपासणी केली. तपासणीदरम्यान ट्रकमध्ये नामांकित कंपनीच्या सिमेंटच्या गोण्या आढळल्या. मात्र त्या बाजूला केल्यावर खाली लपवलेल्या कप्प्यात पुठ्ठ्याचे बॉक्स सापडले. हे बॉक्स उघडून पाहिल्यानंतर त्यामध्ये 'रॉयल सिलेक्ट डिलेक्स व्हिस्की'च्या १८० मिलीच्या सीलबंद बाटल्या आढळून आल्या.

ट्रकमध्ये बेकायदेशीररित्या वाहतूक होत असलेले मद्य हे गोवा राज्यात निर्मित झाले असून मध्यप्रदेशात विक्रीसाठी तयार केलेले



असल्याचे स्पष्ट झाले. या कारवाईत एकूण १२६५ बॉक्स (१०,९२९ बल्क लिटर) विदेशी मद्य जप्त करण्यात आले. तसेच ट्रकसह एकूण १,४५,२३,९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी गुन्हा नोंदवून वाहनचालक दिनेश कैलास नाथ व अनिल कुमार श्यामलाल नायक यांना अटक करण्यात आली आहे. या कारवाईस राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन लाभले असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई, राज्य उत्पादन शुल्क, विभाग आयुक्त डॉ. राजेश देशमुख, अंमलबजावणी व दक्षता विभागाचे सहआयुक्त प्रसाद सुर्वे, कोकण विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार, ठाणे अधीक्षक प्रविण तांबे, उपअधीक्षक आनंद पवार आदींनी केली.

## '४ प्रेयसी, दारूचं व्यसन अन् १२ पानांची चिठ्ठी'; बंगळुरूच्या टेकीने होणाऱ्या पत्नीला आत्महत्येस कसं प्रवृत्त केलं?

■ बंगळुरू/वृत्तसंस्था

लग्न ठरलं, साखरपुडाही झाला. रोज फोनवर बोलणं सुरू होतं. पण अचानक नवरी मुलगी आत्महत्या करते. आत्महत्येचं कारण देत १२ पानी पत्री लिहिते. याप्रकरणी नवऱ्या मुलावर आता गुन्हा दाखल झाला असून याप्रकरणी सखोल तपास सुरू आहे. साखरपुडा ते मुलीची आत्महत्या या काळात नेमकं काय झालं हे धक्कादायक आहे. आंध्र प्रदेशातील कडप्पा जिल्ह्यात हा प्रकार घडला आहे.

चिन्ना चौक उपनिरिक्षक प्रताप रेड्डी यांनी दिलेल्या माहितीनुसार मृत रेहाना (२६)हिने नुकतीच एमएससी पदवी पूर्ण केली होती आणि १५ फेब्रुवारी रोजी तिचा बंगळुरू स्थित तंत्रज्ञ व कडप्पा जिल्ह्यातील प्रोद्दातूरचा रहिवासी असलेल्या शहनजहानसोबत साखरपुडा झाला होता. तर, ऑगस्टमध्ये त्यांचं लग्न होणार होतं. सुरुवातीला या जोडप्यामध्ये सलोख्याचे संबंध होते. ते रात्री उशीरापर्यंतही फोनवर बोलत होते. मात्र, तीन आठवड्यांपूर्वी या शहजहानच्या वागण्यात अचानक बदल झाला. गेल्या काही दिवसांपासून नैराश्यात गेलेली रेहाना बुधवारी कडपा येथील पटेल स्ट्रीटवरील तिच्या राहत्या घरी मृतावस्थेत आढळली.

रेहानाने कथितरित्या १२ पानांची एक सुसाईड नोट लिहिली आहे. यामध्ये तिने तिच्या आत्महत्येला शहाजहानला जबाबदार धरले आहे. त्याच्या वागण्यात अचानक बदल झाल्याने तिने हा टोकाचा निर्णय घेतला. त्या चिठ्ठीत तिने लिहिले, शहाजहानच्या मनात रेहानाविषयी काहीही भावना उरल्या होत्या. त्याला ती अजिबात पसंत नव्हती. तसंच, याआधी त्याच्या चार महिलांसोबत संबंध होते.

रेहानाच्या कुटुंबीयांनी असा आरोप केला आहे की शहाजहानचे वागणे अचानक बदलले आणि त्याने तिच्यावर हे नातेसंबंध संपवण्यासाठी दबाव टाकायला सुरुवात केली. त्याने आमच्या मुलीला सांगितले की त्याला दारुचे व्यसन हते आणि त्याच्या अनेक प्रेयसी हत्या. त्याने अशीही तक्रार केली की त्याच्या वडिलांनी त्याच्यावर लग्नासाठी दबाव टाकला होता आणि रेहानावर लग्न मडण्यासाठी दबाव टाकला. तेव्हा रेहानाने त्याला विचारले की त्याचे वागणे अचानक का बदलले? तेव्हा शाहजहानने आमच्या मुलीला स्पष्टपणे सांगितले की त्याला ती अजिबात आवडत नाही आणि तिच्याबद्दल त्याच्या मनात कोणतीही भावना नाही.

शहाजनहानच्या या वागण्यामुळे आमची मुलगी नैराश्यात गेली आणि तिने आत्महत्या करण्यासारखे टोकाचे पाऊल उचलले. तिने १२ पानी आत्महत्येचा पत्रात आपला अनुभव सांगितला आहे आणि आमच्या मुलीच्या मृत्यूला जबाबदार असलेल्या शहाजनहानला पोलिसांनी शिक्षा करावी, असं आवाहन रेहानाच्या पालकांनी केले.

पोलिसांनी सांगितलं की रेहानाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कडपा येथील राजीव गांधी वैद्यकीय विज्ञान संस्थेत हलवण्यात



आला आहे. रेहानाच्या वडिलांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे चिन्ना पोलिसांनी सुरुवातीला गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. पोलिसांनी शाहजहान आणि त्याचे आई-वडील, एम. वीराया आणि एम. वाहिदा यांना आत्महत्येसाठी प्रवृत्त केल्याच्या आरोपाखाली अटक केली. आरोपींना स्थानिक न्यायालयात हजर करून न्यायालयात हजर करून न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले.

# वर्ल्ड रेकॉर्ड! पंजाबकडून टी-20 क्रिकेटमधील सर्वात मोठ्या आव्हानाचा यशस्वी पाठलाग

■ मुंबई, वृत्तसंस्था :

कॅचेस विन द मॅचेस.. असं क्रिकेटमध्ये म्हटलं जातं, असं का म्हटलं जातं हे दिल्ली कॅपिटल्सला आज चांगलंच समजलं असेल. दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात चौकार आणि षटकारांचा पाऊस पाडला. दिल्ली कॅपिटल्सने पहिल्या डावात फलंदाजी करताना २६४ धावांचा डोंगर उभारला होता. त्यामुळे पंजाबला यशस्वी पाठलाग करण्यासाठी इतिहास घडवायचा होता. आधी प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंगने दमदार सुरुवात करून दिली. त्यानंतर शेवटी श्रेयस अय्यरने वादळी अर्धशतकी खेळी करुन पंजाबला विजय मिळवून दिला. या सामन्यात नेमकं काय घडलं? जाणून घ्या.





या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करताना दिल्लीला हवी तशी सुरुवात मिळाली नाही. पथुम निसांका अवघ्या ११ धावांवर माघारी परतला. त्यानंतर केएल राहुल आणि नितीश राणाच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला. दोघांनी मिळून चौफेर फटकेबाजी केली आणि दुसऱ्या विकेटसाठी २०० धावांची भागीदारी केली. दोघांनी मिळून आयपीएलमध्ये दुसरी सर्वात मोठी भागीदारी करण्याचा रेकॉर्ड आपल्या नावावर केला. केएल राहुलकडून ज्या खेळीची अपेक्षा होती, ती खेळी त्याने पंजाब किंग्ज संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात केली. त्याने ४६ चेंडूंमध्ये आपलं शतक पूर्ण केलं. त्यानंतर तो १५२ धावांवर नाबाद राहिला. या खेळीदरम्यान केएल राहुलने अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. केएल राहुल हा आयपीएलमध्ये सर्वात मोठी खेळी करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. तसेच आयपीएलमध्ये सर्वात मोठी खेळी करणाऱ्या भारतीय फलंदाजाचा रेकॉर्ड हा आता केएल राहुलच्या नावे नोंदवला गेला आहे. आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या पंजाब किंग्जला दमदार सुरुवातीची गरज होती. ही सुरुवात प्रभसिमरन सिंग आणि प्रियांश आर्य या दोघांनी मिळून करून दिली. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी १२६ धावा जोडल्या. यादरम्यान प्रियांश आर्यने ४३ आणि प्रभसिमरन सिंगने ७६ धावांची खेळी केली. दुसऱ्या डावातील सुरुवातीलाच मोठी दुर्घटना घडली. झेल घेण्याच्या प्रयत्नात लुंगी एन्गिडी मागच्या बाजूने धावत होता. इतक्यात त्याचा तोल गेला आणि तो डोक्यावर आपटला. त्याच्या डोक्याला खूप जोरात फटका बसला. त्यामुळे तो काही मिनिटं तसाच झोपून होता. फिजिओ मैदानात आले, त्यानंतर त्याला ॲम्ब्यूलन्सच्या साहाय्याने मैदानाबाहेर घेऊन जाण्यात आलं. त्यामुळे सामना काही मिनिटांसाठी थांबवण्यात आला होता. या धावांचा पाठलाग करत असताना श्रेयस अय्यरला २ वेळा जीवदान मिळालं. करुण नायरने श्रेयस अय्यरचे २ सोपे झेल सोडले. हे झेल दिल्लीला चांगलेच महागात पडले.

## गेलचा सर्वात मोठा रेकॉर्ड थोडक्यात हुकला! KL Rahul अशी कामगिरी करणारा ठरला तिसरा

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ स्पर्धेतील ३५ वा सामना दिल्ली कॅपिटल्स आणि पंजाब किंग्ज या दोन्ही संघामध्ये सुरू आहे. दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर सुरु असलेल्या या सामन्यात केएल राहुलच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. त्याने ४६ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. राहुल शेवटच्या चेंडूपर्यंत खेळपट्टीवर उभा राहिला. त्याने ६७ चेंडूत १६ चौकार आणि ९ षटकारांचा साहाय्याने नाबाद १५२ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने मोठा रेकॉर्ड आपल्या नावावर केला आहे.

आयपीएलच्या १९ हंगामात सर्वात मोठी खेळी करण्याचा रेकॉर्ड हा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा माजी फलंदाज ख्रिस गेलच्या नावावर होता. ख्रिस गेलने पुणे वॉरियर्स इंडिया संघाविरूद्ध खेळताना नाबाद १७ धावांची खेळी केली होती. केएल राहुलकडे हा रेकॉर्ड मोडण्याची संधी होती. पण त्याची ही संधी थोडक्यात हुकली. केएल राहुल १५२ धावांवर नाबाद राहिला. यासह तो आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात सर्वात मोठी खेळी करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. या यादीत दुसऱ्या स्थानी असलेल्या ब्रेंडन मॅक्क्लूलमच्या नावे दुसरी सर्वात मोठी खेळी करण्याची नोंद आहे. त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाविरूद्ध झालेल्या आयपीएलच्या पहिल्याच सामन्यात नाबाद १५८ धावांची खेळी केली होती. तर चौथ्या स्थानी असलेल्या अभिषेक शर्माने १४१ धावांची खेळी केली होती. तर पाचव्या स्थानी असलेल्या क्विंटन डीकॉकच्या नावे नाबाद १४० धावा करण्याची नोंद आहे. केएल राहुल हा टी-२० क्रिकेटमध्ये १५० धावांची खेळी करणारा दुसराच भारतीय फलंदाज ठरला आहे. याआधी तिलक वर्माने मेघालय संघाविरूद्ध झालेल्या सामन्यात १५१ धावांची खेळी केली होती.




या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. हा निर्णय सुरूवातीला फसला, कारण पथुम निसांका अवघ्या ११ धावांवर माघारी परतला. त्यानंतर केएल राहुल आणि नितीश राणाने मिळून पंजाबच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. दोघांनी मिळून २०० धावा जोडल्या. यादरम्यान केएल राहुलने ९१ धावा केल्या. तर केएल राहुल १५२ धावांवर नाबाद राहिला. ही आयपीएल स्पर्धेच्या इतिहासात कुठल्याही भारतीय फलंदाजाने केलेली सर्वात मोठी खेळी ठरली. दिल्लीने २० षटकांअखेर २ गडी बाद २६४ धावा केल्या.

## वैभव सूर्यवंशीचा वर्ल्ड रेकॉर्ड!

■ मुंबई/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ मध्ये राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन बलाढ्य संघांमध्ये एक रोमांचक लढत पाहायला मिळाली. जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर, आक्रमक फलंदाज वैभव सूर्यवंशीने १५ चेंडूत अर्धशतक झळकावलं आहे. वैभवने सनरायझर्स हैदराबादचा गोलंदाज प्रफुल हिंगेविरूद्ध षटकारांचा पाऊस पाडत बदला घेतला. या अर्धशतकासह त्याने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे.

वैभव सूर्यवंशीने वेगवान गोलंदाज प्रफुल हिंगेची चांगलीच धुलाई केली. हंगामातील २१ व्या सामन्यात, प्रफुल हिंगेने वैभव सूर्यवंशीला त्याच्या पदार्पणाच्या डावात पहिल्याच चेंडूवर बाद केलं होतं. त्यावेळी हिंगेने उत्कृष्ट गोलंदाजी करत चार बळी घेतले होते. पण आज, ३६ व्या सामन्यात, सूर्यवंशीने त्या विकेटचा बदला घेतला. सामन्यातील पहिलंच षटक टाकण्यासाठी हिंगे गोलंदाजीला आला. यशस्वी जैस्वालने षटकाच्या पहिल्या चेंडूवर एक धाव घेतली. दुसऱ्या चेंडूवर वैभव सूर्यवंशीने निर्धाव चेंडू खेळला. त्यानंतर या युवा फलंदाजाने आक्रमक पवित्रा घेत सलग चार चेंडूंवर चार षटकार ठोकले. सूर्यवंशीने हिंगेच्या चेंडूवर हल्लाबोल करत पहिल्याच षटकात २५ धावा कुटल्या. या आक्रमक सुरुवातीमुळे राजस्थान रॉयल्सच्या डावाला गती मिळाली. मागील सामन्यात वैभवला बाद करून चर्चेत राहिलेला प्रफुल हिंगे, यावेळी या युवा फलंदाजाविरुद्ध खूपच महागडा ठरला. वैभव सूर्यवंशीने अवघ्या पाच चेंडूंमध्ये २४ धावा केल्या. वैभव सूर्यवंशीने हैदराबादविरूद्ध या खेळीदरम्यान १ हजार टी-२० धावांचा पल्ला गाठला. टी-२० मध्ये सर्वात कमी वयात १ हजार धावा करणारा तो तरूण फलंदाज ठरला आहे. वैभवने वयाच्या १५ वर्षे १९ दिवस वय असताना हा विक्रम आपल्या नावे केला. त्याने फक्त ४७३ चेंडूत आणि २६ डावांमध्ये १ हजार धावा पूर्ण केल्या. तर टी-२० इतिहासात सर्वात कमी डावांमध्ये एक हजार धावा करणारा तो सहावा फलंदाज आहे.

## वैभव सूर्यवंशीचं शतक व्यर्थ! हैदराबादचा राजस्थानवर शानदार विजय

■ हैदराबाद/वृत्तसंस्था

आयपीएल २०२६ च्या डबल हेडरमधील दुसऱ्या सामन्यातही धावांचा पाऊस पाहायला मिळाला. राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामन्यात दोन्ही संघांच्या फलंदाजांनी वादळी फटकेबाजी केली. पण अखेरीस सनरायझर्स हैदराबाद संघाने बाजी मारली. हैदराबादने राजस्थानला ५ विकेट्स आणि ९ चेंडू राखून पराभूत केलं. वैभव सूर्यवंशीचं वादळी शतक मात्र मात्र या पराभवामुळे व्यर्थ ठरलं.

सनरायझर्स हैदराबादचा नियमित कर्णधार पॅट कमिन्स दुखापतीनंतर आता संघात परतला आहे. येताच त्याने पहिल्या सामन्याची नाणेफेक जिंकत राजस्थानला फलंदाजीसाठी पाचारण केलं. राजस्थानने प्रथम फलंदाजी करताना २२८ धावांचा डोंगर उभारला. प्रत्युत्तरात राजस्थानने २ धावा करत सामना जिंकला.




राजस्थानने दिलेल्या २२९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादला पहिल्याच षटकात हेडच्या रूपात धक्का बसला. यानंतर अभिषेक शर्मा व इशान किशन यांनी संघाचा डाव सावरला. इशान व अभिषेकने ५५ चेंडूत १३२ धावांची भागीदारी रचली. अभिषेक २९ चेंडूत ११ चौकार व एका षटकारासह ५७ धावा करत बाद झाला. तर इशान किशन ३१ चेंडूत ११ चौकार व ३ षटकारांसह ७४ धावा करत बाद झाला. नितीश रेड्डी ३६ धावांचं योगदान देत बाद झाला. तर हेनरिक क्लासेनही २९ धावा करत बाद झाला. यानंतर विजयासाठी ६ धावांची गरज असताना सलील अरोराने षटकार खेचत संघाला दणदणीत विजय मिळवून दिला.

प्रथम फलंदाजी करणाऱ्या राजस्थानची सुरूवात चांगली झाली. पण यशस्वी जैस्वाल १० धावा करत बाद झाला. यानंतर वैभव सूर्यवंशी आणि ध्रुव जुरेल यांनी ६२ चेंडूत ११२ धावांची उत्कृष्ट भागीदारी रचली. यादरम्यान वैभवने ३७ चेंडूत ५ चौकार व १२ षटकारांसह १०३ धावांची खेळी केली. तर ध्रुव जुरेल ३५ चेंडूत ८ चौकार व एका षटकारासह ५१ धावा करत माघारी परतला. याशिवाय डोनाव्हन फरेराने ३३ धावांचं योगदान दिलं. यासह संघाने ६ बाद २२८ धावा केल्या. हैदराबादकडून इशान मलिंगाने सर्वाधिक २ विकेट्स तर प्रफुल हिंगे, पॅट कमिन्स, साकिब हुसैन व नितीश रेड्डी यांनी १-१ विकेट्स घेतल्या.

# "गोविंदावर लोक जळायचे, अनेक सुपरस्टार्सना त्याची भीती...", प्रसिद्ध अभिनेत्याने केलं वक्तव्य

बॉलीवूड अभिनेता गोविंदा आपल्या खासगी आणि वैयक्तिक आयुष्यामुळे काही दिवसांपासून चर्चेत आहे. तसेच सोशल मीडियावर त्याच्या डाऊनफॉलच्यादेखील चर्चा होत आहेत. गोविंदा काही स्क्रिप्टवर काम करत असल्याचे त्याच्या मॅनेजरने काही दिवसांपूर्वी सांगितले होते; पण त्याचा नवीन प्रोजेक्ट प्रेक्षकांच्या भेटीला कधी येतोय, याची चाहते वाट पाहत आहेत.

काही दिवसांपूर्वी गोविंदा काही छोट्या कार्यक्रमांमध्ये परफॉर्मन्स करताना दिसला होता. त्यावरून काहींनी अभिनेत्याच्या आर्थिक परिस्थितीवरही प्रश्न उपस्थित केले होते. अशातच यावर आता गोविंदाचे सहकलाकार व अभिनेते अश्विन कौशल यांनी गोविंदाच्या डाऊनफॉलबद्दल प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. अश्विन कौशल यांनी अनेक वर्षे विविध सिनेमांतून प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. 'पीके', 'जवान' व 'गुलाम' यांसारख्या चित्रपटांतून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. गोविंदाबरोबरही त्यांनी काम केले आहे. अशातच नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत अश्विन कौशल यांनी गोविंदाच्या अपयशाबद्दल सांगितले.

सिद्धार्थ कन्ननला दिलेल्या मुलाखतीत ते म्हणाले, "गोविंदाच्या डाऊनफॉलचं एकमेव कारण म्हणजे त्याच्या मनातील भ्रम. याच गोष्टीमुळे त्याचं वागणं आणि त्याचा ॲटीट्यूड असं सगळंच बदललं. नाही तर गोविंदासारख्या अभिनेत्याला कोणी रोखू शकलं असतं का? पण अजूनही वेळ गेलेली नाही. तो काही ९० वर्षांचा झालेला नाही. कोणीतरी त्याला यातून बाहेर काढावं आणि एखादी दमदार भूमिका द्यावी, अशी माझी प्रार्थना आहे."

पुढे ते म्हणाले, "गोविंदाच्या रूपात आजही कादर खान जिवंत आहेत. कादर खान यांनी त्यांना 'तथास्तु' असा आशीर्वाद दिला आहे. ते त्या काळची कला जिवंत ठेवू शकतात; पण त्याच्या मनातील भ्रमामुळे सगळ्या गोष्टी बिघडल्या. लोकांबद्दल बोलायचं झालं' तर ते बोलणारच. त्यांचं कामच आहे ते. लोक राजेश खन्ना यांच्याबद्दलही असंच बोलायचे."

याबद्दल ते पुढे म्हणाले, "लोक राजेश खन्ना यांच्याबद्दलसुद्धा काही ना काही बोलायचेच. पण राजेश खन्नांसारखे स्टारडम पुन्हा कधीच पाहायला मिळणार नाही. अमिताभ बच्चन यांनीही ते स्टारडम पाहिलं नाही. जे स्थान वर ईश्वराचं आहे, तेच खाली राजेश खन्नांचं होतं. गोविंदालाही तसं स्टारडम मिळवता आलं असतं; पण त्याच्या काही निर्णयांनी तो मागे राहिला. तरीही गोविंदानं मनावर घेतलं तर तो उद्या पुन्हा आपला सुपरस्टार हा टॅग परत मिळवू शकतो, हे मी ऑन रेकॉर्ड सांगतोय." त्यानंतर अश्विन यांनी गोविंदाच्या कामाच्या पद्धतीबद्दल ते म्हणाले, "गोविंदावर लोक जळायचे, आजही जळतात. अनेक सुपरस्टार्सना त्याची भीती वाटायची. ती आजही वाटते; पण गोविंदा बऱ्याचदा ज्योतिष आणि ग्रहांच्या योगावर विश्वास ठेवायचा. जर त्याला वाटले की, आजचा दिवस किंवा वेळ शुभ नाही, वाजता तर तो सेटवर यायचाच नाही. मी त्यांच्याबद्दल असं ऐकलं होतं की, तो खूप अंधश्रद्धाळू झाला होता, जे त्याच्या स्वभावाच्या विरुद्ध होतं.



## गोंडस श्वानावरचा चित्रपट कापूसकोंडा

अभिनेता व निर्माता-दिग्दर्शक सचिन पिळगावकर आणि अभिनेत्री मधुराणी गोखले बऱ्याच कालावधीनंतर पुन्हा एकदा रूपेरी पडद्यावर एकत्र पाहायला मिळणार आहेत. या चित्रपटाचे मोशन पोस्टर अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर समाजमाध्यमांवर प्रदर्शित करण्यात आले. कापूसकोंडा हा नवीन मराठी चित्रपट असून यात हे दोघे एकत्र दिसणार असले तरी या चित्रपटाचे ते नायक-नायिका नाहीत. नायकाच्या भूमिकेत आहे कापूसकोंडा नावाचा श्वान.

जास्वंद एंटरटेन्मेंट्स प्रा. लि. निर्मित या चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन सचिन मोहिते यांनी केले असून गणेश पंडित, ऋषिकेश तुरई व सचिन मोहिते यांनी एकत्रितपणे केले आहे. सचिन पाटेकर यांनी छायालेखनाची जबाबदारी निभावली आहे. अक्षता पाडगांवकर, जान्हवी तांबट आणि भूषण पाटील अशी नव्या पिढीतील कलावंतही यात झळकणार आहेत. 'ए फॅमिली डॉग फिल्म' अशी या चित्रपटाची टॅगलाइन आहे.



सचिन पाटेकर यांनी छायांकनाची जबाबदारी निभावली आहे. संगीतकार ए. व्ही. प्रफुल्लचंद्र यांचे संगीत असून अवधूत गुप्ते, पद्मनाभ गायकवाड यांचा स्वरसाज लाभला आहे. सुहास राणे यांनी ध्वनी तंत्रज्ञ म्हणून काम पाहिले आहे. एका सत्य घटनेवर आधारित चित्रपट साकारला आहे. पोमेरेनियन कुळातील मिश्र प्रजातीचा श्वान ज्याचे नाव कापूसकोंडा असे आहे.

## 'सुभेदार गेस्ट हाऊस'चा रंगभूमीवर थरार

प्रख्यात लेखिका अगाथा ख्रिस्ती यांच्या सर्वच पुस्तकांनी प्रसिद्धीची शिखरे गाठली आहेत. सन १९५२ मध्ये त्यांचे 'माऊस ट्रॅप' हे नाटक रंगभूमीवर आले आणि या नाटकाने इतिहास घडवला. गेली सात दशके त्यांचे हे नाटक लंडन येथे सुरू आहे. या नाटकाने आतापर्यंत पंचवीस हजार प्रयोगांचा टप्पा पार केला आहे. अमाप लोकप्रियता मिळवणारे हे नाटक आता मराठी रंगभूमीवर 'सुभेदार गेस्ट हाऊस' या नावाने आले आहे. 'सुभेदार गेस्ट हाऊस' या नाटकाचे लेखन शिरीष देखणे यांनी केले आहे. रहस्यमय बाजाची नाटके रंगभूमीवर आणण्यात हातखंडा असलेले दिग्दर्शक विजय केंकरे यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले आहे. शंतनू मोघे, सौरभ गोखले, अंगद म्हसकर, मृण्मयी गोंधळेकर, विनिता दाते, आनंद पाटील, सना कुलकर्णी, रोहित देशमुख ही आघाडीची कलावंत मंडळी या नाटकात आहेत. 'धि गोवा हिंदू असोसिएशन' ही संस्था या नाटकाच्या निमित्ताने पुन्हा एकदा नाट्यनिर्मितीत उतरली आहे. 'धि गोवा हिंदू असोसिएशन' व 'सुकल्प चित्र' यांनी या नाटकाची निर्मिती केली आहे.

## संजय गायकवाड प्रकरणी मराठी अभिनेता श्रेयस राजेची पोस्ट

आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक आंबी यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ आणि ठार मारण्याची धमकी दिल्याची कथित ऑडिओ क्लिप व्हायरल झाल्याने राज्यात मोठे पडसाद उमटत आहेत.

कथित ऑडिओ क्लिपमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आदर दाखवताना आमदार संजय गायकवाड यांचा तोल गेल्याचे दिसले. या ऑडिओ क्लिपमध्ये त्यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख का केला, याविषयी प्रकाशक प्रशांत आंबी यांना जाब विचारत शिव्यांची लाखोली वाहिली.

राज्यातून चौफेर टीका झाल्यावर अखेर शुक्रवारी आमदार संजय गायकवाड यांनी या प्रकरणी दिलगिरी व्यक्त केली. दरम्यान, संजय गायकवाडप्रकरणी विविध स्तरांतून राजकीय क्षेत्रातून विविध प्रतिक्रिया समोर येत आहेत. अशातच आता एका मराठी अभिनेत्यानेही या प्रकरणी आपले मत व्यक्त केले आहे. हा अभिनेता म्हणजे श्रेयस राजे. मराठी नाटक,



मालिका आणि सिनेमांमधून श्रेयसने प्रेक्षकांचे चांगलेच मनोरंजन केले आहे. आपल्या अभिनयाने चर्चेत राहणारा श्रेयस सोशल मीडियावरदेखील चांगलाच सक्रिय असतो. सोशल मीडियावर तो त्याचे फोटो शेअर करीत चाहत्यांच्या संपर्कात राहत असतो. तसेच तो अनेकदा सामाजिक आणि राजकीय विषयांवरसुद्धा आपल्या सोशल मीडियाद्वारे व्यक्त होताना दिसतो. अशातच अभिनेत्याने संजय गायकवाड यांनी 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या शीर्षकावरून प्रकाशकाला केलेल्या शिवीगाळ प्रकरणावर त्याचे मत व्यक्त केले आहे.

## 'आपण मराठी बोलायची लाज बाळगतो आणि', अभिनेत्रीने शेअर केला व्हिडीओ

येत्या १ मे रोजीपासून राज्यात परवानाधारक रिक्षा व टॅक्सीचालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मराठी वाचता-लिहिता न येणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्याचा इशाराच दिला आहे. या निर्णयावर काही रिक्षा-टॅक्सीचालकांनी विरोधाची भूमिका घेतली आहे.

सरकारच्या या निर्णयाला काही अमराठी रिक्षा-टॅक्सीचालकांनी विरोध दर्शविला आहे आणि संपाचाही इशारा दिला आहे. अमराठी रिक्षा-टॅक्सीचालकांच्या बाबतीत सरकारने घेतलेल्या या निर्णयावर मराठी कलाविश्वातून काही कलाकार प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत. अशातच एका लोकप्रिय अभिनेत्रीने यावर आपले मत व्यक्त केले आहे.

कमळी या लोकप्रिय मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणारी अभिनेत्री सुषमा जयवंतने यावर प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. सुषमा सोशल मीडियावर कायमच सक्रिय असते. सोशल मीडियावर ती मालिकेतील कलाकारांबरोबरचे मजेशीर व्हिडीओ शेअर करत असते. अशातच तिने आता मराठी रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी मराठी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णयावर आपलं मत व्यक्त केलेय. तसेच तिने काही प्रश्न विचारले आहेत.

या व्हिडीओत सुषमा म्हणते, "नमस्कार मी सुषमा जयवंत. एक मुद्दा मी आता बघितला. तुम्ही यूपीवाल्यांना जर मराठी येत नसेल, तर गाडी चालवून देणार नाही. मान्य आहे. खूप छान; पण जेव्हा ते परवाना घ्यायला येतात तेव्हा सरकारकडून किंवा त्यांना जो परवाना मिळतो, तो दिलाच का जातो? तेव्हा





का कुणी सक्ती करत नाही. दुसरा प्रश्न, भैय्या जेव्हा भाजी विकत असतो किंवा तो एखादा रिक्षावाल्याला 'तुम यहां पे आओगे क्या? ये भाजी कितने मे दी?' हे बोलणारा मराठी माणूस आहे ना, त्याला तुम्ही पहिली सक्ती करा. तुम्ही स्वत: पहिल्यांदा मराठीत बोला. आपण मराठी बोलायची लाज बाळगतो आणि आपण इतरांना सांगतो की मराठी बोला. काय लॉजिक आहे? तुम्ही (प्रेक्षक/नेटकरी) आपल्या मुलांना किती मराठी माध्यमात शिकायला पाठवत आहात?"

पुढे ती पुढे प्रेक्षकांना म्हणाली, "भाषेचं बंधन असणं-नसणं मला कळत नाही. पण हे जे काही 'तू गलत है, तू गलत है' चाललंय... त्यात तुपण चुकीचाच आहेस. याच्याबद्दल विचार करा आणि याच्याबद्दल नक्की मत मांडा. मला नक्कीच चर्चा करायला आवडेल..." दरम्यान तिने शेअर केलेल्या या व्हिडीओवर तिच्या नेटकऱ्यांनीसुद्धा मते व्यक्त केली आहेत. तिने केलेल्या व्हिडीओवर अनेकांनी सहमती दर्शवली आहे. सुषमा जयवंतसह 'बिग बॉस मराठी ५'मधील धनंजय पोवार, अभिनेता अंशुमन विचारे, अक्षय केळकर, गायक उत्कर्ष शिंदे, अंकिता वालावलकर, तसेच 'महाराष्ट्राची हास्यजत्रा'मधील सचिन गोस्वामी यांसह काही इतर कलाकारांनीसुद्धा या निर्णयावर मते व्यक्त केली आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# प्रधानमंत्री इंटर्नशिप योजना ३.० चा तिसरा टप्पा सुरू...

## सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी रोजगारांची सुवर्णसंधी

जनसंचलन/बुलढाणा

केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी प्रधानमंत्री इंटर्नशिप योजनेच्या () २०२६ च्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा करण्यात आली आहे. देशातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नामांकित कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता यावा आणि त्यांच्या हाताला काम मिळावे, या उद्देशाने ही योजना कार्यान्वित करण्यात आली आहे. योजनेची वैशिष्ट्ये आणि आर्थिक लाभ: या योजनेअंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना इंटर्नशिप कालावधीत उमेदवाराला दरमहा ९ हजार रुपये विद्यावेतन दिले जाईल. कामावर रुजू होताना उमेदवाराला ६ हजार रुपयांचे एकरकमी अर्थसहाय्य मिळेल. ही इंटर्नशिप ६ ते ९ महिने कालावधीची असेल. विविध क्षेत्रे: सेमीकंडक्टर, आयटी (), रिन्यूएबल एनर्जी यांसारख्या २० पेक्षा अधिक आधुनिक क्षेत्रांमधील ३००+ आघाडीच्या कंपन्यांमध्ये कामाची संधी उपलब्ध. पात्रतेचे निकष: अर्जदाराचे वय १८ ते २५ वर्षे दरम्यान असावे. १० वी, १२ वी उत्तीर्ण असलेले उमेदवार तसेच आयटीआय(), डिप्लोमा, पदवीधर, पदव्युत्तर पदवी() किंवा एमबीए () केलेले तरुण यासाठी पात्र आहेत. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १२ लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. उमेदवार सध्या कोणत्याही पूर्णवेळ नोकरीत नसावा. अर्ज प्रक्रिया: इच्छुक उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अधिकृत संकेतस्थळ ... किंवा .. वर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. उमेदवारांनी दिलेल्या पोर्टलवर जाऊन वर क्लिक करून आपली माहिती भरावी. देशातील तरुणांना केवळ पदवी शिक्षण न देता त्यांना उद्योगाभिमुख कौशल्ये मिळावीत, यासाठी ही योजना मैलाचा दगड ठरेल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र तरुणांनी या संधीचा लाभ घेऊन आपले भविष्य उज्ज्वल करावे, असे आवाहन, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त ग.प्र.बिटोडे यांनी केले आहे.

# स्वाधार योजनेतील अर्जातील त्रुटी दुरुस्तीसाठी ४ मेपर्यंत मुदत

जनसंचलन/बुलढाणा

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या ङ्कभारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनाफ्र अंतर्गत शैक्षणिक सत्र २०२५-२६ साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी अर्जातील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी ४ मे २०२६ ही अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी पात्र असूनही प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील इयत्ता ११ वी, १२ वी तसेच बारावीनंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेद्वारे आर्थिक मदत दिली जाते. विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक खर्चासाठी आवश्यक रक्कम थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते. या योजनेचा अधिकाधिक विद्यार्थ्यांना लाभ मिळावा यासाठी शासनाने २६ डिसेंबर २०२४ रोजीच्या निर्णयानुसार योजनेचा विस्तार तालुकास्तरावरही केला आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांनी ://.. या संकेतस्थळावर लॉगिन करून अर्जाची सद्यस्थिती तपासावी. ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज झाले आहेत त्यांनी आवश्यक त्रुटी दुरुस्त करून ४ मे २०२६ पूर्वी अर्ज पुन्हा ऑनलाईन सादर करावा. अर्ज फॉरवर्ड करण्यापूर्वी बँक खाते क्रमांक, कोड, खातेधारकाचे नाव यांसारखे तपशील अचूक भरावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरला आहे परंतु अर्जाची हार्डकॉपी व आवश्यक कागदपत्रे अद्याप कार्यालयात जमा केलेली नाहीत, त्यांनीही ४ मे २०२६ पर्यंत ती सादर करावीत, असे समाजकल्याण सहाय्यक आयुक्त मनोज मेरत यांनी कळविले आहे.

# उष्णतेच्या लाटेत कामगारांच्या सुरक्षिततेसाठी तातडीचे निर्देश; नियोक्त्यांना उपाययोजना राबविण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा



राज्यासह देशभरात वाढलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेमुळे कामगार व मजूर वर्गाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. विशेषतः बांधकाम, औद्योगिक, खाण व इतर क्षेत्रांतील कामगार उष्णतेच्या जोखमीला सामोरे जात असल्याने त्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी तातडीच्या उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सरकारी कामगार अधिकारी, बुलढाणा यांनी जिल्ह्यातील सर्व नियोक्ते, उद्योग, बांधकाम कंपन्या व संबंधित आस्थापनांना कामगारांच्या संरक्षणासाठी ठोस पावले उचलण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कामाच्या वेळांमध्ये आवश्यक ते बदल करून उष्णतेच्या तीव्र काळात काम टाळण्याचे, तसेच कामगारांना स्वच्छ पिण्याचे पाणी, सावली व विश्रांतीची योग्य व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासोबतच आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्राथमिक उपचार साहित्य, आईस पॅक व उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक साधने उपलब्ध ठेवण्यास सांगितले आहे. आरोग्य विभागाच्या समन्वयाने कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करण्यावरही भर देण्यात आला आहे. कारखाने व खाण क्षेत्रासाठी विशेष सूचनांमध्ये कामाचा वेग कमी ठेवणे, दिवसातील थंड वेळेत जड कामे करणे, विश्रांती वेळेत बदल करणे आणि गरजेनुसार दोन कामगारांची टीम नेमण्याचा समावेश आहे. तसेच कामाच्या ठिकाणी विश्रांतीची सोय, थंड पाणी व इलेक्ट्रोलाइट्सची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आहेत. कामगारांमध्ये उष्णतेचे धोके व त्यावरील प्रतिबंधात्मक उपाय याबाबत जनजागृती करण्यावरही प्रशासनाने भर दिला आहे. कामगार नाके व सार्वजनिक ठिकाणी जनजागृती मोहिमा राबविणे, तसेच पोस्टर्स, बॅनर्स व आपत्कालीन संपर्क क्रमांक प्रदर्शित करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, संबंधित सर्व आस्थापनांनी या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करून नियमित निरीक्षण यंत्रणा उभारावी, तसेच कामगारांच्या आरोग्य व सुरक्षिततेस प्राधान्य देत वैयक्तिक लक्ष देण्याचे आवाहनही कामगार अधिकाऱ्यांनी केले आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळातर्फे कार्यशाळेचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

मातंग समाज तसेच तत्सम बारा पोटजातीतील वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ, जिल्हा कार्यालय बुलढाणा (मर्या) यांच्या वतीने विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा मंगळवार दि. ५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे आयोजित करण्यात येणार आहे. सदर कार्यशाळेचा मुख्य उद्देश मातंग समाजातील नागरिकांना विविध शासकीय योजनांची सविस्तर माहिती देणे, त्यांचा लाभ मिळवून देणे तसेच समाजाचे जीवनमान उंचावणे हा आहे. या कार्यशाळेत विविध योजनांबाबत मार्गदर्शन, शंका निरसन आणि लाभार्थ्यांसाठी आवश्यक प्रक्रिया याबाबत माहिती दिली जाणार आहे. मातंग व मांग समाजातील नागरिकांनी वेळेत उपस्थित राहून या कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक दि. शं. पाखमोडे यांनी केले आहे.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
दैनिक जनसंचलन निडर निर्भीड
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# सिन्नर एमआयडीसीत भीषण अपघात; खैरवचे दोन तरुण जागीच ठार, एकाची मृत्यूशी झुंज...

जनसंचलन चिखली

तालुक्यातील खैरव गावावर दु:खाचा डोंगर कोसळला असून सिन्नर (जि. नाशिक) येथील एमआयडीसी परिसरात झालेल्या भीषण कार अपघातात दोन युवकांचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. ही हृदयद्रावक घटना २५ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ४ वाजताच्या सुमारास घडली. मिळालेल्या माहितीनुसार, खैरव येथील वैभव रामदास शिंदे यांच्याकडील जेसीबीसाठी साहित्य आणण्यासाठी ते स्वतः, चालक श्रीकिसन हनुमान सुरुशे (रा. पाटोदा) आणि संकेत प्रकाश खोसे (रा. खैरव) हे तिघे सियाज कारने सिन्नर येथे गेले होते. मात्र, सिन्नर एमआयडीसीजवळ त्यांच्या




वाहनाचा भीषण अपघात झाला. या अपघातात संकेत खोसे आणि श्रीकिसन सुरुशे यांचा जागीच मृत्यू झाला. वैभव शिंदे हे गंभीर जखमी असून त्यांच्यावर नाशिक येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच खैरवचे सरपंच गजानन शिंदे यांच्यासह नातेवाईकांनी घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरापर्यंत शवविच्छेदन सुरू होते. या दुर्दैवी घटनेमुळे खैरवसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून नागरिकांत तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

# राजुरा पालकमंत्री मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा; महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणाला उपस्थिती



जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे दि. २९ एप्रिल ते १ मे २०२६ दरम्यान तीन दिवसांच्या जिल्हा दौऱ्यावर येणार असून विविध विभागांचा आढावा घेणारआहेत. तसेच महाराष्ट्र दिनानिमित्त होणाऱ्या शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमासही ते उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार बुधवार दि. २९ एप्रिल रोजी रात्री ८ वाजता मुंबई येथून शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. गुरुवार दि. ३० रोजी ११ वाजता अभ्यागतांसाठी राखीव, दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथे खरीप हंगाम-२०२६ आढावा, टंचाई आढावा, पांदण रस्ते आढावा बैठक. दुपारी ३ वाजता खडकपुर्णा प्रकल्पाअंतर्गत विविध विषयांबाबत बैठक व दुपारी ४ वाजता जिगाव प्रकल्पाबाबत आढावा बैठक स्थळ : जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा. सायंकाळी ५.३० वाजता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पदाधिकारी यांची बैठक. शुक्रवार दि. १ मे रोजी सकाळी ८ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे महाराष्ट्र दिनानिमित्त शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमासाठी उपस्थिती व दुपारी सोईनुसार साताराकडे प्रयाण करतील.

पाहिजेत
We are Hiring

खंडेलवाल ज्वेलर्स (अकोला) प्रा.लि.
बुलढाणामध्ये
ज्वेलरी शोरुमसाठी तरुण, उत्साही उमेदवार पाहीजेत.

1) शॉप मॅनेजर- 1 (M/F)
कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक व ज्वेलरी कामाची माहीती असलेल्या अनुभवी व्यक्तींना प्राधान्य

2) सेल्स एग्जीक्यूटिव - 5 (M/F)
बारावी शिक्षण आवश्यक, स्मार्ट व हसतमुख, कॉम्प्युटर अनुभवी आवश्यक.

3) कॅशियर - 2 (M)
पदवीधर आणि तत्पर, जबाबदारीने कॅश काऊंटर हाताळण्याचा अनुभव असलेल्यांना प्राधान्य

आजच संपर्क करा..!

सर्व पदांसाठी सरकारी नियम (PF/ESIC) अनुसारआकर्षक पगार, इन्सेंटीव्हज व ईतर अलाउंस

आपली संपूर्ण माहिती व फोटोसह आपले अर्ज ई-मेल करा
hrkjapl@gmail.com
अधिक माहितीसाठी संपर्क: 9545454762 / 9545450822

# कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाचा आढावा; सहसंचालकांची कुष्ठ कार्यालयास भेट

जनसंचलन/बुलढाणा

सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठ) बुलढाणा कार्यालयास आज आरोग्य सेवा(कुष्ठ व क्षय, पुणे) सहसंचालक राजरत्न वाघमारे तसेच आरोग्य सेवा (राष्ट्रीय आरोग्य अभियान) मुंबई सहसंचालक डॉ. बी. एस. सोनावणे यांनी भेट दिली. भेटीदरम्यान कुष्ठरोग कार्यालयाकडून मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यानंतर श्री. वाघमारे यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांशी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाबाबत सविस्तर चर्चा केली. कार्यालयातील दैनंदिन कामकाज, नव्या कुष्ठरुग्णांची नोंदणी, रुग्णांना औषधोपचार पुरवठा तसेच नोंदींची पडताळणी करण्यात आली. तसेच, शासनातर्फे राबविण्यात आलेल्या कुष्ठरोग शोध मोहिम (), कुसुम व स्पर्श अभियानांतील कामाचा आढावा घेण्यात आला. या मोहिमांदरम्यान कार्यालयाकडून वर्तमानपत्रे व सामाजिक माध्यमांद्वारे करण्यात आलेल्या जनजागृती उपक्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले. सहसंचालकांनी नव्या रुग्णांच्या शोधाबरोबरच रुग्णांच्या सहवासितांना प्रतिबंधात्मक उपचार () देण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या. तसेच, अधिकारी व कर्मचाऱ्यांना कामकाजादरम्यान येणाऱ्या अडचणी जाणून घेत त्या सोडविण्याबाबत आश्वस्त केले. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे, डॉ. खिरोडकर (वैद्यकीय अधिकारी), तसेच सहाय्यक संचालक आरोग्य सेवा (कुष्ठ) कार्यालयातील डॉ. किसन राठोड (वैद्यकीय अधिकारी ), डॉ. ई. बी. शिंदे (अवैद्यकीय पर्यवेक्षक), राजेंद्र धुड, किसन डुकरे, प्रदीप ढोण, रवींद्र बढे (अवैद्यकीय सहाय्यक), अभिजित कुलकर्णी (सांख्यिकी सहाय्यक), गोकुळ गवळी (वरिष्ठ लिपिक) व मनोज वार्डेकर (कनिष्ठ लिपिक) उपस्थित होते.